# महाराज माफ करा, समाज षंड होत चाललाय!!

**महाराष्ट्रात आजही काही कंसाच्या औलादी जिवंत आहेत. खुलेआम बहिणीबाळांच्या अब्रूचे लचके तोडणारी गिधाडे जिवंत आहेत. सत्ता आणि संपत्तीसाठी कित्येक मुडदे पाडली जात आहेत. महाराष्ट्रातील बहिणी बाळांच्या किंकाळ्यांनी आसमंत दणाणलाय! ज्यांच्यावर बेतली आहे, तेच कुटुंब न्यायासाठी आक्रोश करताना दिसून येत आहे. परंतु, न्यायासाठी एकाकी झुंज देणाऱ्या अन्यायग्रस्त कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी समाजा रस्त्यावर उतरायला तयार नाही, तो षंड झालाय! म्हणूनच संतोष देशमुख, सोमनाथ सुर्यवंशी किंवा महादेव मुंडे हत्याकांड असेल ही सगळी प्रकरणे त्यांच्याबरोबरच कायमची दफन केली जात आहेत. तेव्हा महाराज तुमच्यासारखा न्यायी राजा महाराष्ट्राच्या या पावन भूमीत पुन्हा जन्माला आला नाही, येणार नाही. म्हणून महाराज तुम्हीच पुन्हा जन्माला या आणि न्याय द्या, एवढीच अखंड भारताच्या दैवताकडून जयंतीनिमित्त तमाम मावळ्यांकडून अपेक्षा आणि त्रिवार मानाचा मुजरा!!!**




## शिवजन्मोत्सव सोहळा

निमित्त महाराजांना त्रिवार मानाचा मुजरा!

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

बीड ● बुधवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ ● वर्ष १९ वे ● अंक ३०२ वा ● पाने ४ http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

## न्याय्य हक्काच्या मागणीसाठी आरक्षण चिंतन आंदोलनास 22 पासुन सुरुवात होणार !

संभाजीनगर : प्रतिनीधी

राज्य शासनाने एकूणच मराठा आरक्षण व समाजाच्या इतर मागण्या तात्काळ मंजुर करून त्या जाहीर कराव्यात ही मागणी सातत्याने शासन दरबारी मांडून सुद्धा त्यावर काही एक कारवाई करण्यात आली नाही .म्हणून शासनाचे लक्ष वेधण्या साठी मराठा आरक्षण चिंतन आंदोलन २२ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११ .०० वाजे पासून सुरू होणार असुन मागण्या मान्य होई पर्यंत हे आंदोलन सुरू राहील अशी माहिती मराठा क्रांती मोर्चा– मराठा –क्रांती ठोक मोर्चा आयोजीत मराठा आरक्षण चिंतन आंदोलन समितीच्या सदस्यांनी पत्रकार परिषदेत दिली .

हे आगळे वेगळे दिशादर्शक आंदोलन क्रांती चौक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या डाव्या



बाजूच्या मोकळ्या जागेत उड्डाण पुलाखाली अंदाजे २०x१२ फूट व सहा फूटी उंच स्टेज तयार होणार असुन त्यावर मागील बाजुस बॅनर असेल तसेच ३x६ फुटाचे फ्रेम वरील अंदाजे ५० बॅनर फ्रेम सह दहा फुटी उंच बांबु/पाईप वर नागरीकांच्या माहिती स्तव लावण्यात येणार असून त्यावर वर शासनाचे विविध अध्यादेश– न्याय निवाडे याची संदर्भासह माहिती दिली जाणार असुन योग्य प्रकाशा साठी हॅलोजन लाइट प्रकाश योजना सह माईक व स्पीकर व उपस्थित मान्यवर यांना डायस उपलब्ध होणार असुन या ठिकाणी ५०० खुर्ची, चटाई अंथरलेली असेलआणि विशेष बाब म्हणजे वरील सर्व माहिती २०x१२ आकाराच्या एल ई डी स्क्रीन व दाखवल्या जाणार असुन एकंदरीत खरी स्थिती ● पान ३ वर . . .

## हा निव्वळ हरामखोरपणा!

### महिलांच्या उपचारादरम्यान तपासणीचे व्हिडिओ विकून मिळवायचे पैसे!!

### गुजरात पोलिसांची महाराष्ट्रात कारवाई

अहमदाबाद : वृत्तसेवा

राजकोट रुग्णालयात महिलांच्या उपचारादरम्यान तपासणीचे सीसीटीव्ही फुटेज विकण्याच्या घोटाळ्याप्रकरणी अहमदाबाद सायबर गुन्हे शाखेने महाराष्ट्रातील दोन आरोपींना अटक केली आहे . हे दोन्ही आरोपी टेलिग्राम चॅनलवर अशी दृश्ये विकायचे . यासाठी त्यांनी लोकांकडून मोठी रक्कम घेतल्याची माहिती अहमदाबाद सायबर गुन्हे शाखेला मिळाली आहे . राजकोट मधील रुग्णालयातील सीसीटीव्ही आयपीच्या आधारे हॅक करण्यात आल्याचेही अहमदाबाद सायबर क्राइमकडून स्पष्ट करण्यात आले आहे . महाराष्ट्रातील या दोन्ही



आरोपींना घेऊन सायबर क्राईम लवकरच अहमदाबादला पोहोचणार आहेत .

अहमदाबाद सायबर क्राइम ब्रँचच्या अधिकाऱ्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, महिलांवर उपचारादरम्यानचे सीसीटीव्ही फुटेज मिळवून टेलिग्राम चॅनलवर पाहण्यासाठी वेगवेगळ्या लोकांना लिंक पाठवल्या प्रकरणी दोन आरोपींना अहमदाबाद सायबर क्राइम ब्रँचच्या पथकाने ● पान ३ वर . . .

## ऊसतोड मजूर अनिल, आरतीच्या अनाथ लेकरांना दानशूरांकडून मिळतोय आधार

### आ. पंडित यांच्याकडून त्या ऊसतोड मजुरांच्या मुलांना मदत

### बंजारा समाजाच्या वतीने बी एम पवार यांनी मानले आभार

बीड – प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे युवा आमदार विजयराजे पंडित यांनी मयत राठोड कुटुंबीयांची भेट घेतली आणि त्यांच्या कुटुंबीयांना एकावन्न हजार रुपयांची मदत दिली त्याबद्दल बीड जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या वतीने आभार व्यक्त करीत आहोत असे सेवालाल सेना संस्थापक/ अध्यक्ष बी एम पवार आणि माजी जि प सदस्य ad शरद चव्हाण यांनी म्हटले आहे .

या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात असे म्हटले आहे की, माजलगाव तालुक्यातील वारोळा तांड्यातील बंजारा समाजातील ऊसतोडणी मजूर अनिल आणि



आरती ताई यांचे ३१ जानेवारी रोजी अपघाती निधन झाले होते या चिमुकल्या लेकरांच्या मदतीसाठी अनेक दानशूर लोकांनी आर्थिक मदतीचा हात पुढे केला होता आज गेवराई विधानसभा मतदारसंघाचे युवा आमदार विजय राजे पंडित यांनी राठोड कुटुंबीयांची भेट घेतली आणि त्यांच्या अनाथ झालेल्या चिमुकल्या लेकरांना एकावन्न हजार रुपयांची आर्थिक मदत केली त्याच प्रमाणे दोन मुलांना महिला बालकल्याण विभाग अंतर्गत दोन मुलांना पगार मिळवून देण्याचे आश्वासन या वेळी दिले . ● पान ३ वर . . .

विशेष

## ज्ञानेश कुमार देशाचे पुढील मुख्य निवडणूक आयुक्त, पंतप्रधानांच्या नेतृत्वातील बैठकीत निर्णय

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात झालेल्या बैठकीत पुढील मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेश कुमार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. पुढील सीईसी म्हणून नियुक्तीसाठी कायदा मंत्रालयाने अधिसूचनाही जारी केली आहे.

१९८८च्या बॅचचे केरळ केडरचे आयएएस अधिकारी गेल्या वर्षी मार्चपासून निवडणूक आयुक्त म्हणून काम कर आहे. सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार निवृत्त झाल्यानंतर ते पदभार स्वीकारतील. १८ फेब्रुवारीला राजीव कुमार निवृत्त होत आहे.

देशाच्या नवीन मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नावावर विचार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी एक बैठक झाली. नॉर्थ ब्लॉकमध्ये झालेल्या या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी उपस्थित होते. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांचा कार्यकाळ मंगळवारी संपत आहे.

जुन्या व्यवस्थेनुसार, तीन सदस्यीय निवडणूक आयोगातील सर्वात वरिष्ठ निवडणूक आयुक्ताला मुख्य निवडणूक आयुक्त बनवले जात असे. तथापि, निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीशी संबंधित कायद्यानुसार, आता नवीन मुख्य निवडणूक आयुक्तांची निवड एका समितीद्वारे केली जाईल. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवाशर्ती आणि पदाच्या शर्ती) कायदा, 2023 अंतर्गत, नवीन मुख्य निवडणूक आयुक्त हे सध्या आयोगात समाविष्ट असलेल्या निवडणूक आयुक्तांपैकी एक असू शकतात किंवा नवीन नाव ठरवता येते .या कायद्याअंतर्गत, केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील शोध समिती पाच उमेदवारांची यादी तयार करते. सध्या अर्जुन राम मेघवाल हे कायदा आणि न्याय मंत्री आहेत. त्यानंतर पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि पंतप्रधानांनी नामनिर्देशित केलेल्या कॅबिनेट मंत्र्यांचा समावेश असलेल्या निवड समितीद्वारे ही यादी विचारात घेतली जाते. जर एकमत झाले नाही तर समिती बहुमताच्या आधारे नाव ठरवते

## टोरेस घोटाळ्यातील आरोपींचे धागेदोरे बल्गेरियापर्यंत,...तर 40 कोटी परत मिळण्याची शक्यता

मुंबई– टोरेस गुंतवणूक घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या हाती महत्त्वाची माहिती लागली आहे. टोरेस घोटाळा प्रकरणातील फरार आरोपींनी बल्गेरियातही अशाच प्रकारच्या गुंतवणूक योजना सुरू केली असून, त्यांची चौकशी सुरू असल्याचं एका पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. टोरेस फसवणूक प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत सहा जणांना अटक केली असून, तर नऊ जण फरार आहेत. यातील आठ जण युक्रेनचे आणि एक जण तुर्कीचा रहिवासी आहे. घोटाळ्याचा तपास करताना आरोपींनी 12,783 गुंतवणूकदारांना 130 कोटी रुपयांना फसवल्याचे समोर आलंय.

फरार आरोपींकडून गुंतवणूक योजनेच्या नावाखाली बल्गेरियातही फसवणूक : आर्थिक गुन्हे शाखेचे (EOW) कर्मचारी आता बल्गेरियात फरार आरोपींनी वेगळ्या कंपनीच्या नावाखाली सुरू केलेल्या गुंतवणूक योजनांची चौकशी करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे एका अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले. "माहितीची खातरजमा झाल्यानंतर ती अधिकृत माध्यमाद्वारे बल्गेरियातील कायदा अंमलबजावणी संस्थांबरोबर शेअर केली जाणार आहे," अशीही माहिती त्यांनी दिलीय. टोरेस गुंतवणूक घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने 35 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केलीय, ज्यामध्ये रोख रक्कमदेखील समाविष्ट आहे.

कार, फर्निचर, इलेक्ट्रिकल उपकरणांचा लिलाव करण्याची मागणी : तपास करणाऱ्या यंत्रणेकडून मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीने वापरलेल्या कार, फर्निचर, इलेक्ट्रिकल उपकरणांचा लिलाव करण्यासाठी न्यायालयाकडून परवानगी मागितल्याचं एका अधिकाऱ्याने सांगितलंय. "जर या गोष्टी सुरळीत पार पडल्या तर गुंतवणूकदारांचे सुमारे 40 कोटी रुपये परत मिळू शकतात," असंही त्यांनी अधोरेखित केलंय. टोरेस ज्वेलरी ब्रँडचे मालक प्लॅटिनम हर्न प्रायव्हेट लिमिटेडवर पॉन्झी आणि मल्टी–लेव्हल मार्केटिंग योजनांच्या आमिषानं गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

# सहमुख्य अधिकारी यांच्या दालनात पैसे उधळणे प्रकरणी म्हाडा उपाध्यक्षांतर्फे समिती गठीत

मुंबई : मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी यांच्या दालनाबाहेर एका महिलेने पैसे उधळण्याचा प्रकार नुकताच घडला. याप्रकरणी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी समिती गठित केली असून या समितीने ११ अर्जदारांची पात्रता तपासून त्यांना संक्रमण गाळे वाटपसंबंधीचा तपशीलवार अहवाल येत्या पंधरा दिवसात सादर करण्याचे निर्देश सोमवारी दिले. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील विक्रोळी कन्नमवार नगर संक्रमण शिबिरातील चाळ क्रमांक १२, १३ व १४ या चाळींमधील गाळे जुने जीर्ण व वास्तव्याकरिता धोकादायक असल्याने पुनर्विकासासाठी सदर चाळीतील गाळ्यांच्या बदल्यात इतर संक्रमण शिबिरात पर्यायी स्थलांतर देण्याच्या मागणीसाठी ११अर्जदारांनी अर्ज केला.

या अगोदर जुलै २०२०, मार्च २०२१, जून २०२१ व ऑक्टोबर २०२१ मध्ये कन्नमवार नगर विक्रोळी संक्रमण शिबिरातील जुन्या जीर्ण व धोकादायक चाळींमधील वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांना संभाव्य जीवित वित्त आणि टाळण्यासाठी मानवतेच्या दृष्टिकोनातून पुनर्विकास कार्यक्रमांतर्गत नव्याने बांधण्यात आलेल्या नवीन पुनर्रचित इमारतीत उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरण यांच्या मान्यतेँने पात्र/अपात्रतेच्या अधीन राहून तात्पुरते स्थलांतरण देण्यात आले आहे. सदर परिपत्रक केवळ सद्यस्थितीत वास्तव्यास असणाऱ्या




भाडेकरू/ रहिवाशांना लागू आहे. सद्यस्थितीला नमूद ११ अर्जदार हे धोकादायक व जीर्ण संक्रमण गाळ्यांमध्ये वास्तव्यास नाहीत. त्यामुळे सदर प्रकरण हे धोरणात्मक असल्याने त्याला वरिष्ठांची मान्यता आवश्यक होती. पूर्वी संक्रमण शिबिरामध्ये घुसखोरांविरूद्ध मोहिमेअंतर्गत म्हाडामार्फत कार्यवाही करून संक्रमण शिबिरातील घुसखोरांचे गाळ्यांमधून निष्कासन करण्यात आले होते, या पार्श्वभूमीवर अर्जदारांच्या अर्जाची सखोल पडताळणी करणे आवश्यक आहे.

हे प्रकरण हे वीस वर्षांपूर्वीचे असल्याने या ११ अर्जदारांना नवीन संक्रमण शिबिर का दिले गेले नसावे याची पडताळणी होणे गरजेचे आहे. यामुळे सदर बाब धोरणात्मक असल्याने उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या स्तरावर याबाबत आदेश होणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव पाठवण्यात आला, असे म्हाडामार्फत सांगण्यात आले. 'तक्रारदार महिला या स्वत: बाधित नसून ११ अर्जदारांनी स्वत: या प्रकरणाचा पाठपुरावा करणे संयुक्तिक होते. मात्र, तसे न होता ११ अर्जदारांच्यावतीने संबंधित महिलेने या माध्यमातून प्रशासकीय यंत्रणेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या माध्यमातून सहमुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांना नाहक बदनाम करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर प्रकरण हे २० वर्षांपूर्वीचे असून सहमुख्य अधिकारी पदावर संबंधित अधिकारी हे दीड वर्षांपूर्वी रुजू झालेले आहेत. मात्र, तक्रारदार महिलेने सदर प्रकरणांबाबत चुकीच्या पद्धतीने लक्ष वेधण्याचा प्रकार केला आहे.

गेल्या दीड वर्षात उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळामध्ये पारदर्शक व गतिमान कारभार सुरू असल्याने या कारभाराला कुठेतरी अडथळा आणण्यासाठी सदर प्रकार असू शकतो. ही समिती गठीत झाल्यामुळे याबाबतचा अहवाल लवकरच प्राप्त होणार असून सदर अकरा अर्जदारांची पात्रता निश्चित झाल्यानंतर संक्रमण गाळेसंबंधी उचित निर्णय घेण्यात यावा', असे निर्देश म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी आज सोमवारी दिले आहेत.

# बोरिवलीच्या राष्ट्रीय उद्यानात छावा'चे आगमन !

मुंबई : संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सिंह सफारी आणि व्याघ्र सफारीला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या सर्वाधिक आहे. सिंह सफारीत गुजरातहून आणलेली 'मानस' आणि 'मानसी' ही सिंहाची जोडी लोकप्रिय ठरली आहे. दरम्यान, या सफारीत आता सिंहाची नवीन जोडी दाखल झाली आहे. त्यामुळे राष्ट्रीय उद्यानातील सिंह सफारीला नव्याने चालना मिळणार आहे.

बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात गुजरात येथील सक्करबाग प्राणिसंग्रहालयातून आणलेली सिंहाची जोडी आता सिंह सफारीत दाखल झाली आहे. गुजरात येथील सक्करबाग प्राणिसंग्रहालयातून २६ जानेवारी रोजी सिंहाची ही जोडी आणण्यात आली होती. ही सिंहाची जोडी तीन वर्षांची आहे. काही दिवस या जोडीला निरिक्षण कक्षात ठेवण्यात आले होते. आता ही जोडी सिंह सफारीत दाखल झाली आहे. त्यामुळे यापुढे पर्यटकांना सिंहाची नवी जोडीही पाहता येणार आहे.




काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय उद्यानातील मानसीने एका छाव्याला जन्म दिला. 'मानस' आणि 'मानसी' सिंहाची ही जोडी २०२२ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात दाखल झाली होती. मात्र, त्या जोडीचे मिलन होत नव्हते. मागील वर्षी उद्यानातील पथकाने मानसी आणि मानस यांच्या मिलनासाठी प्रयत्न सुरु केले होते. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात २००९ मध्ये रवींद्र आणि शोभा ही सिंहाची जोडी आणण्यात आली होती. शोभा सिंहिणीने २०११ मध्ये दोन माद्या आणि एक नर छाव्याला जन्म दिला. 'लिटिल शोभा', जेस्पा आणि गोपा हे या जोडीचे छावे. सिंहाचे हे कुटुंब गेली अनेक वर्षे पर्यटकांसाठी आकर्षण ठरले होते. मात्र, काही वर्षांपूर्वी शोभाचा मृत्यू झाला. त्यानंतर २०२१ मध्ये गोपाचा मृत्यू झाला. तर २०२२ मध्ये रविंद्र आणि जेस्पा यांचाही मृत्यू झाला.

अनेक वर्षे राष्ट्रीय उद्यानातील अविभाज्य भाग असलेले सिंहांचे कुटुंब निवर्तल्यानंतर २०२२ मध्ये गुजरातमधून 'मानस' आणि 'मानसी' या सिंहांच्या जोडीला संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात आणण्यात आले होते. मागील वर्षी उद्यानातील पथकाने मानसी आणि मानस यांच्या मिलनासाठी प्रयत्न सुरु केले होते. काही दिवसांपूर्वी या जोडीने एका छाव्याला जन्म दिला आहे. आता संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील सिंहाची एकूण संख्या ५ झाली आहे. त्यातील मानस आणि मानसीचा छावा वगळता बाकी चार सिंह सफारीमध्ये पाहता येतील.

# साखरे ऐवजी गुळ का वापरावा....

. उसाचा रस आटवून गुळ तयार केला जातो. गूळ तयार करताना उसामध्ये असणारी विविध पोषकतत्वे, खनिजे, क्षार व व्हिटॅमिन्स गुळामध्ये टिकून राहतात. गुळामध्ये लोह, मॅग्नेशियम, पोटॅशियम, मँगनीज ही पोषकघटक मुबलक असून यात व्हिटॅमिन– B, कॅल्शिअम, जस्त, फॉस्फरस व तांबे यासारखी महत्वाचे घटकही असतात. याठिकाणी गुळ खाण्याचे फायदे याविषयी माहिती दिली आहे.



### गुळ खाण्याचे हे खूप फायदे आहेत...

हिमोग्लोबिन वाढवते... ऍनिमिया दूर करण्यासाठी गुळ खाणे फायदेशीर असते. 100 ग्रॅम गुळामध्ये 11 mg लोहाचे प्रमाण असते. रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी झाल्याने ऍनिमिया किंवा पांडुरोग होत असतो. अशावेळी हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढण्यास गूळ फार उपयुक्त असते.

### रक्तदाब नियंत्रित ठेवतो...

गूळ खाण्यामुळे ब्लडप्रेशर योग्य ठेवण्यास मदत होते. कारण गुळात मुबलक प्रमाणात पोटॅशिअम असल्याने रक्तदाब नियंत्रित राहतो.

### पचनशक्ती सुधारते...

गुळामुळे पचनशक्ती सुधारण्यास मदत होते. तसेच गूळ खाण्यामुळे नियमित पोट साफ होऊन बद्धकोष्ठता दूर होण्यास मदत होते.

### स्त्रियांसाठी उपयुक्त...

सर्वच वयोगटातील स्त्रियांसाठी गुळ खाणे उपयुक्त असते. कारण मासिक पाळी, अयोग्य आहार यांमुळे स्त्रियांमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण खूपच कमी आढळते. यासाठी वयात येणाऱ्या मुली, मासिक पाळी असणाऱ्या स्त्रियांनी गुळाचा आहारात जरूर समावेश करावा. गरोदरपणातही लोहाचे खूप महत्त्व असते. यासाठी गरोदर स्त्रियांना प्रेग्नन्सीमध्ये आणि डिलिव्हरीनंतरही गूळ हितकारी असतो.

### आयुर्वेदानुसार गुळाचे महत्व आणि गुळाचे आहेत...

आयुर्वेदात गुळाचे खूप महत्व आहे. त्यामुळे अनेक आयुर्वेदिक औषधेही गुळाबरोबर दिली जातात. आयुर्वेदातही गुळ खाण्याचे फायदे अनेक सांगितले आहेत. गुळ हे वातनाशक असून गुळ सुंठीबरोबर खाल्ल्यास वाताचे शमन होऊन मज्जावह संस्थेला म्हणजे नर्व्हस सिस्टीमला बल देते. जुना गुळ खाल्यास कफनाशनाचे कार्य होते. गुळामुळे दमा, खोकला यासारखे कफाचे विकार कमी होण्यास मदत होते. शरीरातील थकवा दूर करण्यासही गुळ उपयोगी ठरते.

### साखर खाणे चांगले की गुळ खाणे चांगले...?

साखरेच्या तुलनेत गुळ पौष्टिक असतो. आयुर्वेदानेही साखरेपेक्षा गूळ हा श्रेष्ठ मानला आहे. साखरेत केवळ कॅलरीज असतात आणि याशिवाय कोणतेही उपयुक्त पोषकतत्वे साखरेत नसतात. त्यामुळे साखरेचे पदार्थ अति खाण्यामुळे शरीरात अतिरिक्त कॅलरीज वाढून वजन व चरबी वाढत असते. त्यामुळे हृदयविकार व डायबेटीसचा धोकाही वाढत असतो. तर गुळामध्ये लोह (आयर्न), मॅग्नेशियम, कॅल्शिअम, व्हिटॅमिन– B अशी अनेक आवश्यक पोषकतत्वे असतात. तसेच शरीरात गुळाचे शोषण धिम्यागतीने होते. त्यामुळे रक्तातील साखर लगेच वाढत नाही. त्यामुळे साखर आणि गुळाची तुलना करता, आरोग्यासाठी गुळचं खाणे हितकारक असते.


### गुळ खाण्यामुळे होणारे नुकसान...


अधिक प्रमाणात गुळ खाण्यामुळे वजन वाढू शकते. वजन अधिक वाढण्यामुळे डायबेटीस, हृद्यविकार होण्याचा धोकाही वाढू शकतो.

गूळ अधिक खाण्यामुळे पोटात जंत होण्याचा त्रास होऊ शकतो. आमवात किंवा rheumatoid arthritis चा त्रास असल्यास गुळ खाणे टाळावे. कारण यात sucrose चे प्रमाण अधिक असल्याने या त्रासात सांध्यातील सूज अधिक वाढू शकते .गुळ अधिक खाण्यामुळे रक्तातील साखर (ब्लड शुगर) वाढू शकते. त्यामुळे डायबेटीस रुग्णांनी गूळ अधिक खाणे टाळावे. मधुमेह असणाऱ्यानी आपल्या डॉक्टरांच्या सल्ल्याने गुळाचा समावेश करावा.

## जेवणानंतर गूळ खाण्याचे अनेक फायदे; या आरोग्य समस्यांपासून आराम मिळेल - रोगांशी लढण्याची क्षमता वाढते

● गुळ हा आपल्या देशात नैसर्गिक गोडवा म्हणून ओळखला जातो. आजकाल तरूणांमध्ये गूळ लोकप्रिय नसला तरी आजही वृद्ध लोक त्यांच्या दिवसाची सुरुवात गुळाने करतात. किंबहुना उसाच्या रसापासून तयार होणारा हा गुळ पोषक तत्वांनी समृद्ध असतो. गुळामध्ये लोह ते कॅल्शियम सर्व असते.





### गूळ खाणे शरीरासाठी फायदेशीर :

बरेच लोक जेवणानंतर गूळ खातात. गुळाचे सेवन शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. हे शरीराला अनेक पोषक तत्वांनी समृद्ध ठेवते. यामुळेच लोकांना जेवणानंतर गूळ खाण्याचा सल्ला दिला जातो. मात्र, त्याचे अतिसेवन देखील टाळावे.

### जेवणानंतर गूळ खाण्याचे फायदे :

● रक्तदाब नियंत्रण :

गूळ खाण्याच्या अनेक फायद्यांपैकी एक म्हणजे आपला रक्तदाब नियंत्रित ठेवतो. उच्च रक्तदाब असलेल्या लोकांसाठी गुळाचे सेवन हे अमृत मानले जाते.

● तग धरण्याची क्षमता वाढवते :

गुळातील पोषक घटक शरीराचा स्टॅमिना वाढवतात आणि आपल्याला सक्रिय ठेवतात. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही थेट गूळ खाऊ शकता आणि जर तुम्हाला गूळ जास्त आवडत नसेल तर तुम्ही लिंबाच्या रसामध्ये काळे मीठ मिसळून त्याचे सेवन करू शकता.

● दृष्टी कमी होण्यासाठी गूळ फायदेशीर :

ज्यांना डोळ्यांसंबंधी समस्या आहेत त्यांच्यासाठी गूळ खाणे खूप फायदेशीर आहे. डोळ्यांची कमकुवतपणा दूर करून दृष्टी सुधारण्यास प्रभावी आहे.

● मजबूत हाडे :

गुळात विविध पोषक तत्वांसह कॅल्शियम आणि फॉस्फरस भरपूर प्रमाणात असतात. ज्यामुळे आपली हाडे मजबूत होतात. विशेषत: वाढत्या वयातील मुलांमध्ये हाडे मजबूत होण्यासाठी गूळ खाणे खूप महत्वाचे आहे.

● मेंदू निरोगी ठेवते :

गूळ आपल्या मेंदूलाही निरोगी ठेवण्याचे काम करतो. गूळ रोज खाल्ल्यास मायग्रेनसारखे आजार दूर करण्याची ताकद असते. तसेच गूळ नियमित खाल्ल्याने स्मरणशक्ती सुधारते.

● रोगप्रतिकारशक्ती वाढवा :

तुम्हाला शरीरात ऊर्जा भरून ठेवायची असेल किंवा तुमची प्रतिकारशक्ती मजबूत हवी असेल तर जेवणानंतर गूळ खाण्यास सुरुवात करावी.

● वजन कमी करण्यासाठी गूळ उपयुक्त :

जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर तुम्ही रोज गुळाचे सेवन करू शकता. जेवणानंतर गूळ खाण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे वजन कमी करण्यात फायदेशीर ठरते.

● पचनसंस्था मजबूत करते :

जर एखाद्या व्यक्तीला पचनक्रिया मजबूत करायची असेल तर त्याने रोज गुळाचे सेवन करावे. असे केल्याने गॅस, अपचन, मळमळ यासारख्या तक्रारी दूर होतात.

सांज दैनिक बीड
वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

विशेष

## बीड प्रकरणात मोठी डील, आता उद्धव ठाकरेंची एन्ट्री होणार, संजय राऊत कडाडले

मुंबई– बीडमधील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आवाज उठवणारे भाजपाचे आमदार सुरेश धस यांचे चंद्रशेखर बावनकुळे आणि देवेंद्र फडणवीस बॉस आहेत, असे ते म्हणतात, म्हणजे बावनकुळे यांनीच त्यांना ट्रॅपमध्ये पकडलंय. धस यांनी जेव्हा आकाचे आका आले, तेव्हा बैठकीतून बाहेर पडायला हवे होते, मात्र त्यांनी तसे केले नाही, यामध्ये मोठे डील झाले आहे, असा आरोप शिवसेना उबाठाचे प्रवक्ते आणि खासदार संजय राऊत यांनी केलाय.

या प्रकरणात मोठे डील झाले : डील झाल्याशिवाय धसांनी माघार घेतली नाही, आका आणि आकाचे आका यांच्यावर त्यांनी आरोप केलेत, कागद दाखवले, त्या सर्वांना आता अचानक ब्रेक लागलाय. धस माघार घेतील, असे मला यापूर्वी माहिती देण्यात आली होती. ती त्यांची परंपरा आहे, एखादे डील पदरात पाडून घेतील, असे मला सांगण्यात आले होते. या प्रकरणात मोठे डील झाले आहे, असा आरोप करत देशमुख कुटुंबीयांची फसवणूक झाली असल्याचंही संजय राऊत म्हणालेत.

आता शिवसेनेची एन्ट्री होणार : सुरेश धस आणि इतर काही जण या प्रकरणाला वाचा फोडत आहेत, असे वाटले होते. मात्र आता घोळ झाल्याने आम्हाला यामध्ये उतरावे लागणार आहे. शिवसेनेला यामध्ये उतरावे लागेल आणि लक्ष घालावे लागेल. शिवसेनेचे सर्व नेते बीडला जातील आणि तिथे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे येतील आणि देशमुख कुटुंबीयांची भेट घेतील, अशी माहितीही संजय राऊत यांनी दिलीय. काल सुप्रिया सुळे आणि इतर नेते जाऊन आलेत. आम्ही हवे तर एकत्रित लक्ष घालू. धस यांनी केलेल्या कृत्यामुळे आता देशमुख कुटुंब खऱ्या अर्थानं निराधार आणि पोरके झालंय, देशमुख कुटुंबाची फसवणूक झालीय, त्यामुळे आम्ही त्यांना न्याय मिळवून द्यायला जाणार असल्याचे ते म्हणालेत. मंगळवारी शिवसेनेच्या झालेल्या बैठकीत आम्ही चर्चा केली आणि बीडला जाण्याचा निर्णय घेतल्याची माहिती राऊतांनी दिलीय.

## कोण होणार दिल्लीचा मुख्यमंत्री? : आज भाजपा बैठकीत होणार फैसला

नवी दिल्ली : दिल्लीचा नवा मुख्यमंत्री कोण होणार याचा फैसला आज भाजपाच्या विधिमंडळ बैठकीत घेण्यात येणार आहे. आज भाजपाच्या 48 नवनिर्वाचित आमदारांची बैठक होणार आहे. या बैठकीत विधिमंडळ पक्षाच्या नेत्याची निवड केली जाईल. त्यानंतर उपराज्यपाल व्हीके सक्सेना यांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा सादर केला जाईल. या बैठकीला शपथविधीचे प्रभारी विनोद तावडे आणि तरुण चुघ यांच्याव्यतिरिक्त दिल्ली भाजपा अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा आणि इतर भाजपा पदाधिकारी देखील उपस्थित राहणार आहेत. 20 फेब्रुवारी रोजी रामलीला मैदानावर शपथविधी सोहळा होणार असून त्याची तयारी जोरात सुरू आहे.

दिल्ली भाजपा प्रदेश कार्यालयात बैठक : मंगळवारी संध्याकाळी दिल्ली भाजपा प्रदेश कार्यालयात बैठक झाली. या बैठकीला राष्ट्रीय संघटन मंत्री बी एल संतोष, भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, तरुण चुघ आणि दिल्ली भाजपाचे प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र सचदेवा आदींची उपस्थित होती. मुख्यमंत्री शपथविधी सोहळ्यासाठी दिल्लीतील पदाधिकाऱ्यांना आमंत्रित करण्याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली. मंदिराच्या पुजाऱ्यांपासून ते दिल्लीतील सर्व झोपडपट्टी परिसराच्या 250 विस्तारकांनाही आमंत्रित करण्यात येण्याची चर्चा सध्या सुरू आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचा शपथविधी मोठ्या धूमधडाक्यात होणार असल्याचं दिसून येत आहे.

# स्कॉर्पिओ आणि दुचाकीचा भीषण अपघात; सहा ठार, स्कॉर्पिओ चक्काचूर

रांची : स्कॉर्पिओ आणि दुचाकीचा भीषण अपघात होऊन सहा जण ठार झाल्यानं मोठी खळबळ उडाली. ही घटना झारखंडमधील गिरिडीहमधील मधुबन पोलीस ठाण्याच्या परिसरातील लट्टाकट्टो इथं घडली. या अपघातात स्कॉर्पिओमधील सोमेश चंद्र, गोपाल कुमार, गुलाब कुमार, तर दुचाकीवरील बबलू कुमार टुडू, हुसैनी मियाँ या मृतकांची ओळख पटली आहे. अपघातात स्कॉर्पिओचा चक्काचूर झाला आहे.

स्कॉर्पिओ आणि दुचाकीची समोरासमोर धडक : मंगळवारी मध्यरात्री स्कॉर्पिओ आणि दुचाकी विरुद्ध दिशेनं येत होते. यावेळी स्कॉर्पिओ चालकाला प्रकाशामुळे गाडीवरील संतुलन बिघडलं. त्यानं प्रथम दुचाकीस्वाराला धडक दिली आणि त्यानंतर गाडी झाडावर आदळली. या अपघातात दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाला. तर गाडी झाडावर आदळल्यानंतर स्कॉर्पिओचा चक्काचूर झाला. स्कॉर्पिओमधील चार जण ठार झाले. अपघाताची माहिती मिळताच डुमरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुमित कुमार यांनी घटनास्थळावर मधुबन पोलिसांच्या पथकालापाठवलं. पोलिसांनी अपघातग्रस्त नागरिकांना तत्काळ रुग्णालयात दाखल केलं. मात्र रुग्णालयात जखमी नागरिकांना तपासून मृत घोषित करण्यात आलं.

स्कॉर्पिओमधील चार तर दुचाकीवरील दोघांचा मृत्यू : पोलीस उपविभागीय अधिकारी सुमित कुमार यांनी सांगितलं की, "माहिती






मिळताच घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी मृतदेह गाडीतून बाहेर काढले. या अपघातात सहा जणांना जीव गमवावा लागला आहे. मृतांमध्ये चार जण स्कॉर्पिओमधील तर दोन जण दुचाकीवरील प्रवास करणारे आहेत. मृतांची ओळख पटवण्याच काम युद्धपातळीवर सुरू आहे. मृतांमध्ये स्कॉर्पिओमधून प्रवास करणाऱ्या तीन मृतांची ओळख पटली आहे. यात सोमेशचंद्र रविशंकर प्रसाद सिंह, गोपाल कुमार नरेश प्रसाद सिंह, गुलाब कुमार (इसरी बाजार) यांचा समावेश आहे. हे सर्व मुंगेर मुफस्सिल पोलीस ठाण्याच्या परिसरात असलेल्या दरियापूर इथले रहिवासी आहेत. तर एकाची ओळख अद्यापही पटू शकली नाही."

### दुचाकीवरील दोघांचा मृत्यू :

या अपघातात दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाला आहे. यात मधुबन पोलीस ठाण्याच्या परिसरात असलेल्या छछंधो इथले रहिवासी बबलू कुमार टुडू आणि धावतंड इथल्या हुसैनी मियाँ लाटो मियाँ अशी मृत दुचाकीस्वारांची ओळख पटली आहे.

## भिवंडीत अग्नीतांडव सुरूच; भीषण आगीत तीन कंपन्यांचे गोदाम जळून खाक

ठाणे– जिल्ह्यात सतत लागणाऱ्या आगीच्या दुर्घटनांमुळे ज्वालामुखीचा तालुका म्हणून ओळख निर्माण झालेल्या भिवंडीत तालुक्यात अग्नीतांडवचे सत्र सुरुच आहे. आज पहाटेच्या सुमारास लागलेल्या आगीत तीन गोदाम जळून खाक झाली आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार भिवंडी तालुक्यातील मुंबई–नाशिक महामार्ग लगत असलेल्या येवई गावच्या हद्दीत आर .के .लॉजिस्टीक गोदाम संकुलात बॅकारोझ परफ्युमस अण्ड ब्युटी प्रोडक्टस् प्रा ली , इन्टरक्राफ्ट ट्रेडिंग प्रा . ली, फ्रेगरेंस शॉप प्रा . लि या तीन कंपन्यांचे गोदाम आहेत. या गोदामात मोठ्या प्रमाणात परफ्यूमचा साठा साठवून करून ठेवला होता. त्यातच (१९ फ्रेबुवारी) आज पहाटे चार वाजल्याच्या सुमारास अचानक एका गोदामाला आग लागली. काही क्षणात आगीनं रौद्ररूप धारण केलं. ही आग पसरत जवळच्या गोदामांना लागली. या आगीच्या कचाट्यात सापडल्यानं तीन कंपन्यांचे गोदाम जळून खाक झाली आहेत. अचानक लागलेल्या भीषण आगीमुळे कोट्यवधींचे नुकसान झाल्याचा



अंदाज वर्तवण्यात येत आहे .आग विझविण्याकरिता लागले 7 तास– आगीच्या घटनेची माहिती मिळताच भिवंडी कल्याण डोंबिवली ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या गाड्यासह पाण्याचे टँकर घटनास्थळी पोहचले. आगीवर नियंत्रण मिळवण्याचं काम सुरू केलं. परफ्युमच्या साठ्यामुळं आग अधिकच भडकत होती. सध्या, घटनास्थळी कुलींगचे काम सुरू असल्याची माहिती मुख्य अग्निशमन अधिकारी राजेश पवार यांनी दिली आहे. ही भीषण आग आटोक्यात आणण्यासाठी सुमारे ७ तास लागल्याची माहितीही त्यांनी दिली. सुदैवानं कोणतीही जीवितहानी नाही. आग लागण्याचं नेमके कारण अद्याप समोर आलेलं नाही .18 फेब्रुवारीला लागली होती भीषण आग– दुसरीकडे भिवंडी शहरातील ढाणगे आळी परिसरात गुरुदेव शॉपिंग प्लाझा इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर असलेल्या कोचिंग क्लासेसमध्ये १८ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास विद्यार्थी शिकत असतानाच आग लागल्यानं खळबळ उडाली होती. त्यावेळी कोचिंग क्लासमध्ये सात ते आठ विद्यार्थी अडकले होते, स्थानिकांच्या मदतीनं पोलिसांनी सर्व मुलांना सुरक्षित बाहेर काढले. भिवंडी अग्निशमन दलाच्या दोन गाड्यांनी आगीवर नियंत्रण मिळविलं. ही आग एसीमध्ये शॉट सर्किट झाल्यानं लागल्याची माहिती अग्निशमन अधिकारी पवार यांनी दिली आहे.

## न्याय्य हक्काच्या मागणीसाठी आरक्षण चिंतन आंदोलनास २२ पासुन सुरुवात होणार !

● पान १ वरून . . . नागरीकांना या द्वारे ज्ञात होणार असुन असे अभ्यासु सादरी करण आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे द्वारे होणारे राज्यभरा तील एकमेव अभिनव आंदोलन असुन अगदी पहिल्या वेळेस कायदेशीर व घटनात्मक माहिती याचे सादरीकरण हे तज्ञ अभ्यासक पी पी टी द्वारे सादर करणार आहेत.

मराठवाड्यातील समाज बांधवाना आरक्षण देण्याची फक्त अंमल बजावणी करण्याची गरज असुन ती कशी दिल्या जाऊ शकते याची माहीती सुद्धा या आंदोलना दरम्यान याचिका कर्ते देणार असुन मुख्य मार्गदर्शक म्हणून आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक आणि सर्वोच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ते डॉ .राजेंद्र दाते पाटील आणि उच्च न्यायालय छत्रपती संभाजी नगर मधील याचीका कर्ते किशोर चव्हाण आहेत.

या आंदोलनासाठी मुख्य चिंतन समिती स्थापन करण्यात आली असुन त्यात रमेश केरे पाटील, रविंद्र काळे या सह चिंतन समिती सदस्य म्हणुन ज्ञानेश्वर गायकवाड, शैलेश भिसे, निलेश डव्हळे, भारत कदम, परमेश्वर नलावडे, प्रदिप नवले, सचिन सरकटे, अरुण नवले, राहुल पाटील, विकीराज पाटील, प्रशांत खंडागळे, किशोर मगर, शैलेंद्र चव्हाण, किरण काळे, अनिल कुटे, योगेश बहादुरे, उमेश पाटील, गणेश थोरात नितीन पाटील, विजय घोगरे, लक्ष्मण मोटे, सुनिल बोडखे, संजय नलावडे, किशोर जाधव, मनीष सोनवणे, अनिल कुटे, आप्पा साहेब जाधव, किरण काळे, योगेश बहादुरे, उमेश अंडील या सह अनेक मान्यवरांचा सामावेश असुन महीला समन्वयक यांना सुद्धा यात लवकरच सामावून घेतले जाणार असुन आरक्षणाच्या मुख्य मागणी सह सारथी मधील संशोधक विद्यार्थी वर्गाच्या प्रलंबीत मागण्या, स्व .आण्णा साहेब पाटील महामंडळ अधिकचे भक्कम व बळकट करण्या साठीची मागणी सुद्धा केली जाणार असुन आंदोलका वरील गुन्हे वापस घेणे आदी मागणी सह स्व .संतोष देशमुख यांचे निर्घृण हत्या प्रकरणा तील सर्वच मारेकऱ्यांवर गुन्हे दाखल करून अटक करणे तसेच परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांचे हत्येस कारणी भुत सर्वावर हत्या केल्याचा गुन्हा दाखल होऊन फाशी देऊ करणारी प्रकिया राबविणे आदी कामे शासनाने तत्काळ हाती घ्यावे अशी मागणी असुन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी तात्काळ कारवाई होण्या साठी मराठा क्रांती मोर्चा–मराठा क्रांती ठोक मोर्चा आयोजीत मराठा आरक्षण चिंतन आंदोलन समिती समस्त सदस्यांचे म्हणने ऐकुन घेण्यासाठी शिष्ट मंडळास वेळ द्यावा म्हणून छत्रपती संभाजीनगर चे पालकमंत्री संजय शिरसाट तसेच मंत्री अतुल सावे यांना निवेदन देण्यात आले असुन मराठा समाजाचे आरक्षण व उपरोक्त मागण्या मंजुर केल्या नाहीत तर सदरचे अभिनव आंदोलन हाती घेण्यात आले असल्याची माहीती दि .१० फेब्रुवारी २०२५ रोजी सिडको भागात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत मराठा क्रांती मोर्चा–मराठा क्रांती ठोक मोर्चा आयोजीत मराठा आरक्षण चिंतन आंदोलनसमिती सदस्यांनी दिली.

### ऊसतोड मजूर अनिल, आरतीच्या अनाथ

## लेकरांना दानशूरंकडून मिळतोय आधार


● पान १ वरून . . . बंजारा समाजातील ऊसतोडणी मजूर अनिल आणि आरती ताई यांच्या तीन अनाथ झालेल्या चिमुकल्या लेकरांच्या मदतीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे राज्याचे नेते, माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब आणि युवा आमदार विजय राजे पंडित यांनी मदतीचा हात पुढे केला त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार व्यक्त करीत आहोत असे बी एम पवार, बाबुराव जाधव, शरद चव्हाण, जीवन राठोड, नितीन चव्हाण, राजेश राठोड शरद पवार, संजय राठोड, भगवान राठोड, जायकोबा राठोड, रोशन राठोड, ad तुकाराम आडे, सुनील चव्हाण, आबासाहेब पवार, दत्ता राठोड इत्यादींनी म्हटले आहे.

## हा निव्वळ हरामखोरपणा!

● पान १ वरून . . . महाराष्ट्रातील दोन वेगवेगळ्या जिल्ह्यातून अटक केली आहे. हे दोन्ही आरोपी आधी देखील अशा प्रकारे महिलांचे अश्लील व्हिडिओ विकून पैसे कमावत होते. या दिशेने अजूनही तपास सुरू आहे. या दोन आरोपींना अहमदाबाद सायबर क्राइम ब्रँचमध्ये आणल्यानंतर त्यांची अधिक चौकशी केली जाईल.

राजकोट मधील हॉस्पिटलच्या सीसीटीव्हीच्या तपासणीतही या यूट्यूब चॅनलमध्ये सीसीटीव्ही अपलोड करण्यात आले होते, हेही उघड झाले होते. हॉस्पिटलच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आयपीच्या आधारे हे फुटेज हॅक करण्यात आले होते. नंतर हे फुटेज सोशल मीडियावर विकले गेले.

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |



# उमरी केसरी किताब तालखेड च्या ताडेश्वर प्रसन्न ने पटकाविला; 109 बैलगाडा प्रेमींचा सहभाग






माजलगाव / अरविंद ओव्हाळ :
शिवजन्मोत्सव निमित्त उमरी येथे घेतलेल्या बैलगाडा शर्यतीमध्ये मराठवाड्यातील १०९ बैलगाडा प्रेमींनी सहभाग घेतला होता दि.१७ रविवार रोजी दिवसभर चाललेल्या बैलगाडा शर्यतीमध्ये अंतिम फेरीमध्ये उमरी केसरीचा किताब तालखेड येथील ताडेश्वर प्रसन्न बैलगाडा ने पटकावला तर दुसरा नंबर वर्णा येथील खंडोबा प्रसन्न ने मिळवला त्यातील एक ते आठ नंबर आलेल्या बैलगाडा मालकांना रोख रक्कम व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

शिवजन्मोत्सव निमित्त उमरी येथे बैलगाडा शर्यतीचे आयोजन दि.१७ रविवार रोजी करण्यात आले होते या बैलगाडा शर्यतीमध्ये संपूर्ण मराठवाडा मधून १०९ बैलगाडा प्रेमींनी सहभाग घेतला होता एकूण १५ फेऱ्या झाल्या होत्या. उपांत्य फेरीचा ४ फेऱ्या करण्यात आल्या तर फायनल ला एक फेरी करण्यात आली या फेरीमध्ये एक ते आठ नंबर आलेल्या बैलगाडा प्रेमींना रोख रक्कम व बक्षीस देऊन बैलगाडा मालकांना सन्मानित करण्यात आले.

उमरी केसरीचा किताब तालखेड च्या ताडेश्वर प्रसन्न चे बैलगाडा मालकाला आसाराम घायतिडक यांच्या हास्ते ३१ हजार १३१ रुपये चे रोख रक्कम देण्यात आले तर दोन नंबरच्या श्री खंडोबा प्रसन्न वर्णा बैलगाडा जोडीचे मालक यांना यांना सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती उमरी यांच्या कडुन २१ हजार १२१रू.चे तिसरा नंबर आलेले महारूद्र प्रसन्न हादगाव यांना महादेव माणे कडुन ११ हजार १११ रूपये. चौथा नंबर आलेले सुभाष मुरकुटे नित्रुड यांना पत्रकार वैजनाथ घायतिडक यांच्या कडुन ९ हजार ९९९ रूपये पाचवा नंबर अर्जुन जाधव व विजय पवार यांना ज्ञानेश्वर घायतिडक यांच्या कडुन ७ हजार ७७७ रूपये सहावा नंबर आलेले श्री शंभू महादेव प्रसन्न खवणे पिंपरी यांना बळीराम घायतिडक यांच्या कडुन ५ हजार ५५५ रूपये सतवा नंबर आलेले प्रकाश पौळ व राठोड अंगलगाव या बैलगाडा मालकाला मथुरदास घायतिडक यांच्या कडुन ४ हजार ४४४ रूपये तर आठवे बक्षीस नारायण गड प्रसन्न बीड यांना नितीन घायतिडक यांच्या कडुन ३ हजार ३३३ रू ची रोख रक्कम देऊन सर्व बैलगाडा मालकांना सन्मानित करण्यात आले हा बैलगाडा शर्यत पाहण्यासाठी जिल्हाभरातून बैलगाडा प्रेमी आले होते तर या बैलगाडा शर्यतीमध्ये संपूर्ण मराठवाड्यातून १०९ बैलगाडा प्रेमींनी भाग घेतला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती उमरी यांच्या कार्यकर्त्यांनी काम पाहिले.

विशेष




## छत्रपती शिवाजी महाराज जनकल्याणकारी राजा होते डॉ. सतीश कदम

माजलगाव / प्रतिनिधी :
छत्रपती शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने जनकल्याणकारी राजा होते असे प्रतिपादन जनविकास महाविद्यालय बनसारोळा येथील इतिहास विभाग प्रमुख तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरचे इतिहास अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. सतीश कदम यांनी केले.

सिद्धेश्वर महाविद्यालयात इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने काल आयोजित शिवजन्मोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड हे तर प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, डॉ. गोरक्षनाथ फसले यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. सतीश कदम म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांना रयतेचे राज्य निर्माण करायचे होते. त्यासाठी त्यांनी स्वराज्य निर्माण करताना वेगवेगळ्या जाती-धर्मातील लोकांना एकत्र करून त्यांना परकीय शत्रूपासून आपण आपले रक्षण कसे करून घेतले पाहिजे व गोरगरीब रयतेचे राज्य निर्माण व्हावे अशी छत्रपती शिवाजी महाराज यांची इच्छा होती म्हणून अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र करून त्यांनी स्वराज्याची स्थापना केली. अध्यक्षीय समारोपात अभय कोकड म्हणाले की, खऱ्या अर्थाने आज छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती ही देशभर जन्मोत्सव म्हणून साजरी केली जाते. कारण असा दूरदृष्टी असलेला राजा आपल्या देशाला लाभला हे आपले भाग्य होय. प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी देखील मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.गोरक्षनाथ फसले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सिताराम इंगोले यांनी केले तर आभार प्रा. प्रतिभा जाधव यांनी मानले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, कार्यालयीन अधीक्षक विजय कुलकर्णी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चैतन्य नरसाळे यांची मंत्रालय मध्ये महसूल सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल सत्कार



माजलगाव : तालुक्यातील घलाटवाडी येथील चैतन्य नरसाळे यांची (MPSC) मार्फत मंत्रालय मध्ये महसूल सहाय्यक पदी निवड झाली.आज आधार मल्टी सर्वीस पात्रुड येथे भेट दिली त्यांचा सत्कार खतीब शहेबाज यांच्या तर्फे करण्यात आला. या वेळी सर्व मित्र परिवार उपस्थित होते.




## पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुलांसांठी वाळु उपलब्ध करून द्या- दादासाहेब गिरी, ब्रम्हदेव धुरंधरे"

गेवराई : देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांची महत्त्वकाक्षी पंतप्रधान आवास योजनेंतर्गत गेवराई नगरपालिकेकडून शहरातील संजयनगर, साठेनगर, संघमित्र नगर, येथील अतिक्रमण धारकांना पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलाच्या बांधकामास परवाने देण्यात आलेल्या लाभार्थींना शासन निर्णयानुसार एका लाभार्थीस पाच ब्रास वाळु मोफत देण्याचा शासन निर्णय झालेला आहे त्या त्या निर्णयानुसार गेवराई नगरपालिकेने संजयनगर साठेनगर संघमित्र नगर येथील लाभार्थींना सद्यस्थितीत वाळु मिळत नाही त्यामुळे अनेकांच्या घरांचे काम सुरूच झालेले नाहीत तरी तहसीलदार साहेबानी वाळु उपलब्ध करून नागरिकांची गैरसोय दुर करण्यासाठी शासन निर्णयांची अंमलबजावणी करुन पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांची महत्त्वकाक्षी पंतप्रधान आवास अ:ऑयोजना यशस्वी करण्यासाठी आपण प्रयत्न करावेत अशी विनंती नागरिकांसह मा.नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब यांनी ना. तहसीलदार सोनवणे यांच्या कडे निवेदनद्वारे केली आहे

गेवराई नगरपालिकेकडून शहरातील संजयनगर साठेनगर मधील अतिक्रमण धारकांना मा.आ.लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुल मंजुर झालेले आहेत पण आजच्या परिस्थितीत गेवराईत वाळु मिळत नाही त्यामुळे गोरगरीब जनतेला बेभाव वाळु घेणे शक्य नाही तरी पंतप्रधानाची महत्वकांशी पंतप्रधान आवास योजना यशस्वी करण्यासाठी सरकारने शासन निर्णयानुसार एक घरकुलासाठी 5 ब्रास वाळु द्यावी असा निर्णय सरकारने घेतला होता त्यांची अंमलबजावणी करुन संजयनगर, साठेनगर, येथील गोरगरीब नागरिकांना सहकार्य करावे असे तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे यावेळी मा. नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे, मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, मा.नगरसेवक राम पवार, शेख निजाम, लक्ष्मण चव्हाण, पिंटु साळवे, शेख ईर्शाद, दिलीप सोनवणे, अनिल खांडेकर, राणा कानाडे, शेख जहीर, शेख मुददशीर, शेख बाबा, आकाश खाजेकर, बाळराजे थोरात, राम लिबोरे, राजेंद्र तापडीया, कृष्णा सोलकर, बंडु रोकडे, साईनाथ पाटुळे, प्रभु सुतार, आदी उपस्थित होते

## सह्याद्री प्रतिष्ठाणच्या वतीने शिवजयंती कार्यक्रमास उपस्थित रहा

माजलगाव / प्रतिनिधी :
येथील सह्याद्री प्रतिष्ठाणच्या वतीने शहरात आज दि.१९ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव, सकाळी ११ वाजता रक्तदान शिबीर तर सायं.५ वा.छत्रपती शिवाजी महाराज चौकात हॅगींग डि.जे. तर प्रथमच अमृतसर पंजाब येथील वीर खालसा ग्रुपचे चित्तथरारक कवायतींचे सादरीकरण हे मुख्य आकर्षण असून याचा लाभ घ्यावा असे आवाहन सह्याद्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष नवनाथ गायकवाड, कार्याध्यक्ष दिलीप झगडे यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सभापती जयसिंह सोळंके यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थांनी भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके तर सभापती जयदत्त नरवडे, संभाजी शेजुळ, शिवाजी रांजवण, चंद्रकांत शेजुळ, रोहन घाडगे, सुशिल सोळंके, नासेर पठाण, खलील पटेल, अच्युत लाटे, राहुल लंगडे, विजय शिंदे, सुशांत पौळ, भागवत भोसले, बाळासाहेब सोळंके, सुशिल डक, सहाय्यक पोलिस अधिक्षक डॉ. बी. धिरजकुमार, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसिलदार संतोष रूईकर, मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण, डॉ. सुरेश साबळे, पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ, बालक कोळी, डॉ. श्रेयस देशपांडे, डॉ. ज्ञानेश्वर गिलबीले, डॉ. अमोल परतुरकर यांचेसह अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

### अमृतसर पंजाब येथील वीर खालसा ग्रुप च्या चित्तथरारक कवायती - गायकवाड, झगडे



या आगळ्या - वेगळ्या व शहरात प्रथमच अमृतसर पंजाब येथील वीर खालसा ग्रुपचे चित्तथरारक कवायती होणार असुन याचा लाभ घ्यावा असे आवाहन सह्याद्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष नवनाथ गायकवाड, कोषाध्यक्ष नारायण शेजुळ, सचिव प्रशांत शेटे, कार्याध्यक्ष दिलीप झगडे व सह्याद्री प्रतिष्ठाणच्या वतीने करण्यात आले आहे.

## माजलगाव तालुक्यात मिशन जरेवाडी अंतर्गत मध्य चाचणी परीक्षा सुरळीत संपन्न

### गटविकास अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांच्या शाळांना भेटी

माजलगाव / प्रतिनिधी :
निपुण भारत अंतर्गत मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान अभियान अंतर्गत मिशन FLN प्रकल्प अर्थात मिशन जरेवाडी या बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या महत्त्वकांक्षी प्रकल्पांतर्गत दिनांक १७ व १८ फेब्रुवारी २०२५ रोजी माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २२७ शाळेत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी मध्य चाचणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार प्राथमिक स्तरावर शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पर्यंत मूलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. भारत सरकारने निपुण भारत अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता तिसरी पर्यंत मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान सन २०२६-२७ पर्यंत प्राप्त करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे.



दिनांक १५ जानेवारी पासून बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान साध्य करण्यासाठी मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान २०२५ बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या मार्गदर्शनानुसार व डायटचे प्राचार्य डॉ विक्रम सारूक , बीड जिल्हा परिषदेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी यांच्या नियोजनाखाली राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २२७ शाळांमधून दिनांक १७ व ८ फेब्रुवारी २०२५ रोजी गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक व गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली मध्य चाचणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील सर्व शाळांना केंद्रप्रमुख, विषय तज्ञ, साधन व्यक्ती यांनी परीक्षे दरम्यान भेटी दिल्या. नियोजित वेळापत्रकाप्रमाणे शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांनी मध्य चाचणी परीक्षेचे आयोजन केले होते. ही स्कूल पोर्टलच्या माध्यमातून स्तर निश्चिती करण्यासाठीची अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली आहे.

## मंगलनाथ मंदिरात यात्रा महोत्सव शिवमहापुरण कथेचा लाभ घ्यावा - सौ यशोदा जाधव





माजलगाव : बायपास रस्त्यावर असलेल्या मंगलनाथ मंदिरात मंगलनाथ यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन दि.२० फेब्रुवारीपासुन शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील पुरातन अशा मंगलनाथ मंदिरात मंदिराचे संस्थापक संत सितारामी महाराज यांच्या आशिर्वादाने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी यात्रा महोत्सव होत असुन दि.२० ते २६ फेब्रुवारी पर्यंत शिव महापुराण कथा दु.१ ते ४ या वेळेत होणार असुन कथाप्रवक्ते श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्री श्री हरिहरानंद भारती स्वामीजी हे आहेत. कथेच्या यजमान सौ. रूपालीताई सचिन शिंदे या असुन महाप्रसादाचे यजमान राजेश भाऊ मेंडके मित्र मंडळ आहे. दि.२७ फेब्रुवारीला महाप्रसाद दु.१ नंतर वाटप करण्यात येणार आहे. मंडप व साउंड सिस्टीम अंगद विश्वांभर गुंदेकर यांचे वतीने देण्यात आली आहे. या शिवमहापुराण कथा व यात्रा महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन सौ.योशोदा ज्ञानेश्वर जाधव, व भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## संत कबीर अर्बन बँकेचे चेअरमन रंजीत टाकणखार यांच दु:खद निधन



माजलगाव : येथील प्रसिद्ध संत कबीर अर्बन मल्टीस्टेट बँकेचे चेअरमन रणजीत टाकणखार वय ४० वर्ष यांचे काल छत्रपतीसंभाजीनगर येथे का खाजगी रुग्णालयात निधन झाले .

अत्यंत कमी वयात बँकिंगचे क्षेत्रांमध्ये नावलौकिक केलेले व सर्व बँकिंग क्षेत्रामध्ये सर्वांशी प्रेमाने व मनमिळाऊ पणाने वागणारे व उत्कृष्ट ॲडमिनिस्ट्रेशन असणारे तसेच सर्वांना हवे हवे असणारे सामाजिक चळवळीत योगदान देणारे रणजीत टाकणखार यांच्या अकस्मित निधनाने माजलगाव शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत होती त्यांच्या पश्चात वडील एकनाथ लिंबाजीराव टाकनखार त्यांच्या आई सामाजिक कार्यकर्त्या वालाबाई एकनाथराव टाकणकार पत्नी एक मुलगी एक मुलगा दोन भाऊ भावजय असा मोठा परिवार आहे त्यांचा अंत्यविधी काल दिनांक १८ रोजी सायंकाळी ५ वाजता मंगलनाथ स्मशानभूमी येथे झाला याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दयानंद स्वामी, राष्ट्रवादीचे नेते कचरूजी खळगे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष विजय दादा साळवे वंचित चे धम्मानंद साळवे लोकनेते सुंदर असोळंके कारखान्याचे चेअरमन वीरेंद्र दादा सोळंके तुळजाभवानी मल्टीस्टेट बँकेचे चेअरमन चंद्रकांत शेजुळ मंगलनाथ मल्टीस्टेट चे चेअरमन रवींद्र कानडे श्रीराम बँकेचे अध्यक्ष व भाजपचे माजी तालुकाध्यक्ष हनुमान भाऊ कदम तसेच बँकिंग क्षेत्रातील सर्व अध्यक्ष पदाधिकारी कर्मचारी शहरातील सर्व वकील,पत्रकार सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह मोठा जनसमुदाय उपस्थित होता.